**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातमीपत्र**
**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांकः24.08.2025** **वारःरविवार**

---

- देशाची अवकाश क्षेत्रातील प्रगती सामान्य नागरिकांचे जीवन सोपं करत असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादंन.

- जीवनावश्यक वस्तूंवरील जीएसटी शून्य टक्के करण्याची उद्योग संघटनांची मागणी.

- भजनी मंडळांना भांडवली अनुदान देण्याची राज्य सरकारची घोषणा.

- आगामी आशिया क्रिकेट चषक स्पर्धेसाठी भारतीय संघाची घोषणा.

आणि

- कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाचे कुलगुरु प्राध्यापक हरेराम त्रिपाठी यांचं अपघाती निधन.

**<u>अवकाश दिन</u>**

भारताने आज अवकाश क्षेत्रात केलेली प्रगती सामान्य नागरिकांचे जीवन सोपं करत असल्याचं प्रतिपादंन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. राष्ट्रीय अवकाश दिनानिमित्त देशवासीयांशी विशेष संवाद साधताना ते काल बोलत होते. भारत लवकरच स्वतःचं अवकाश संशोधन केंद्र सुरू करणार असल्याचं मोदी यावेळी म्हणाले. भारत अवकाश तंत्रज्ञानाकडे केवळ वैज्ञानिक शोधाचे साधन म्हणून न पाहता जीवनमान सुलभ करण्यासाठीचे एक साधन म्हणून पाहतो असं सांगताना देशाच्या संशोधनाबाबत बोलताना मोदी म्हणाले.. . . .. . . . .. .

अवकाश तंत्रज्ञान भारतातील प्रशासनाचा एक अविभाज्य भाग बनत असून राष्ट्रीय अवकाश दिन हा इतिहासवरील आत्मविश्वास आणि भविष्यातील संकल्प असल्याचं पंतप्रधान यावेळी म्हणाले. देशातील शास्त्रज्ञांच्या अथक परिश्रमाच्या जोरावर आपण लवकरच गगनयान मोहीम यशस्वी करू असा विश्वास मोदी यांनी यावेळी व्यक्त केला. मोदी यांनी पीएम गति शक्ती राष्ट्रीय मास्टर प्लॅनमध्ये पीक विमा योजनांमध्ये उपग्रह-आधारित मूल्यांकन, उपग्रह-सक्षम माहिती आणि सुरक्षा, आपत्ती व्यवस्थापन अनुप्रयोग आणि भू-स्थानिक डेटाचा वापर यासारखी उदाहरणे दिली.

राष्ट्रीय अवकाश दिन हा तरुणांमध्ये उत्साह आणि आकर्षणाचा एक भाग बनला असल्याचं मोदी यांनी यावेळी सांगितलं. गेल्या ११ वर्षांत, सरकारने अवकाश क्षेत्रात अनेक सुधारणा राबवल्या आहेत असंही मोदी यावेळी म्हणाले.

**<u>अमेरिकापोस्टबंद</u>**

२५ ऑगस्टपासून अमेरिकेला पाठवल्या जाणाऱ्या सर्व टपाल वस्तू तात्पुरत्या स्वरूपात बंद करण्याचा निर्णय दळणवळण मंत्रालयाच्या अंतर्गत येणाऱ्या टपाल विभागाने घेतला आहे.  अमेरिकन सरकारने दिलेल्या कार्यकारी आदेशानुसार हा निर्णय घेण्यात आला आहे. या आदेशानुसार ८०० डॉलर्सपर्यंतच्या वस्तूंसाठीची शुल्कमुक्त सूट या महिन्याच्या २९ तारखेपासून रद्द करण्यात येणार आहेत. दळणवळण मंत्रालयाने जारी केलेल्या एका प्रसिद्धीपत्रकात, पत्रं , कागदपत्रं आणि १०० डॉलर्स मूल्यांपर्यंतच्या भेटवस्तूंच्या वस्तू शुल्कमुक्त राहतील असं नमूद केलं आहे. ज्या ग्राहकांना आधीच आरक्षित केलेल्या वस्तू या परिस्थितीमुळे अमेरिकेला पाठवता येणार नाहीत अशा वस्तूंच्या टपाल खर्चाची परतफेड मागू शकतात.

**<u>जीएसटी</u>**

येत्या तीन आणि चार सप्टेंबर रोजी जीएसटी अर्थात वस्तु आणि सेवा कर परिषदेची छप्पन्नावी बैठक नवी दिल्लीत होणार आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक होणार आहे. या बैठकी दरम्यान जीएसटीशी संबंधित घेण्यात आलेल्या काही निर्णयांमध्ये बदल करण्याची शिफारस होण्याची शक्यता आहे.

**<u>जीएसटीरद्द</u>**

वाढती महागाई हा देशातील सर्वसामान्यांसाठी सर्वांत मोठा प्रश्न झाला आहे. दैनंदिन जीवनासाठी लागणाऱ्या वस्तूंचे दर दिवसेंदिवस वाढत असून, त्यावर आकारण्यात येणाऱ्या पाच टक्के जीएसटीमुळे ही भाववाढ आणखी गंभीर बनली आहे. त्यामुळेच जीवनावश्यक वस्तू आणि मिरचीवरील जीएसटी पूर्णपणे रद्द करून शून्य टक्के करण्यात यावा, अशी मागणी फेडरेशन ऑफ असोसिएशन ऑफ ट्रेडर्सतर्फे करण्यात आली आहे. यासंदर्भातील निवेदन पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय वित्तमंत्री निर्मला सीतारामन तसेच जीएसटी समितीच्या मुख्य आयुक्तांना पाठविण्यात आले आहे. सरकारने या मागणीवर लवकरात लवकर सकारात्मक निर्णय घेऊन महागाईच्या तडाख्यात सापडलेल्या सर्वसामान्यांना दिलासा द्यावा, अशी अपेक्षा फेडरेशनचे अध्यक्ष वालचंद संचेती यांच्याकडून  व्यक्त करण्यात आली आहे.

**<u>लखपती</u>**

महिलांच्या सहभागाशिवाय विकसित भारत शक्य नसल्याचं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. ते काल मुंबईत दादर इथं एका कार्यक्रमात बोलत होते. केंद्र सरकारच्या माध्यमातून 'बेटी बचाव' पासून 'लखपती दीदी' पर्यंत अनेक योजना राबविल्या आहेत. लखपती दीदी योजनेच्या माध्यमातून राज्यात मागील वर्षी २५ लाख भगिनी लखपती बनल्या असून राज्य देशात पहिल्या क्रमांकावर आहे.

या प्रादेशिक बातम्या आपण आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरून ऐकत आहात.

**<u>गणेशोत्सव</u>**

राज्यातील गणेशोत्सव आता राज्य महोत्सव म्हणून घोषित केला असून या महागणेशोत्सवात सर्व नागरिकांनी सहभाग नोंदवावा असं आवाहन सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांनी केलं आहे. शेलार याच्या हस्ते महागणेशोत्सव राज्य उत्सवानिमित्त गीत आणि पोर्टलचे लोकार्पण काल मुंबईत करण्यात आलं त्यावेळी ते बोलत होते. महाराष्ट्र राज्य सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धांमधील परितोषिकाची रक्कम वाढवण्यात आली असून राज्यस्तरीय प्रथम विजेत्याला साडेसात लाख रुपये तर जिल्हास्तरावरीय प्रथम विजेत्यास ५० हजार आणि तालुकास्तरीय विजेत्यांना २५ हजार रुपये आणि प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. याकरिता प्रवेश अर्जाची ऑनलाईन प्रक्रिया उपलब्ध करून देण्यात आली आहे. भजनी मंडळांना भांडवली अनुदान देण्याची योजना असून १८०० भजनी मंडळांना प्रत्येकी २५ हजार रूपये यानुसार भांडवली अनुदान वितरित करण्यात येणार आहे. यासाठी २३ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर २०२५ या दरम्यान महाअनुदान डॉट ओ आर जी या संकेतस्थळावर असल्याचे शेलार यांनी यावेळी सांगितले.

**<u>पाहणी-</u>**

केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी बुलडाणा जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या जिल्ह्यातील चिखली तालुक्यामधील शेत जमिनीची काल पाहणी केली. अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या बाधित क्षेत्राची नोंद पंचनाम्यामध्ये करून घेण्याच्या , पंचनाम्याचे चावडी वाचन करण्याचे तसंच नुकसानग्रस्त पात्र लाभार्थी सुटणार नाही यांची काळजी घेण्याच्या सूचना जाधव यांनी यावेळी दिल्या.

**<u>कोयना</u>**

कोयना धरणामध्ये जमीन गेल्यानंतर अद्यापपर्यंत जमिन मागणीसाठी अर्ज केला नाही अशा धरणग्रस्तांनी जमीन मागणीचा अर्ज जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करावा. महसूल प्रशासनाने पसंतीच्या जमिनी दाखविण्यासाठी विशेष शिबीराचे आयोजन करावे, असे निर्देश पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी दिले आहेत. कोयना धरणग्रस्तांच्या पुनर्वसन आणि महिंद प्रकल्पग्रस्तांना भूखंड वाटपाबाबतचा आढावा काल देसाई यांनी घेतला त्यावेळी ते बोलत होते. मुळ मालक हयात नसलेल्या नागरिकांच्या वारसांनी अर्ज करावेत असंही देसाई यांनी यावेळी सांगितलं.

**<u>प्रभाग</u>**

राज्यातल्या आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी महानगरपालिकांची प्रारूप प्रभाग रचना नुकतीच जाहीर झाली आहे. पुणे महापालिकेच्या निवडणुकीसाठी झालेल्या प्रारूप प्रभाग रचनेबाबत महायुतीतील राष्ट्रवादी काँग्रेसने नाराजी व्यक्त केली आहे. पक्षाचे शहराध्यक्ष सुभाष जगताप यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांचे प्रभाग प्रशासनाने चुकीच्या पद्धतीने फोडल्याचा आरोप केला आहे. या प्रभागरचनेबाबत हरकती सूचना देण्यात येतील तसेच उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याशी चर्चा करण्यात येईल असं जगताप यांनी स्पष्ट केलं आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रारूप प्रभागांच्या भौगोलिक सीमांबाबत ४ सप्टेंबर २०२५ पर्यंत संबंधित कार्यालयात हरकती आणि सूचना सादर करता येणार आहेत.

**<u>आशियाकप</u>**

आगामी आशिया क्रिकेट चषकासाठी भारतीय संघांची घोषणा करण्यात आली आहे. सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखाली भारतीय संघ सहभागी होणार असून शुभमन गिलकडे उपकर्णधारपदाची जबाबदारी देण्यात आली आहे. ही स्पर्धा ९ ते २८ सप्टेंबर दरम्यान संयुक्त अरब अमिरातीमध्ये खेळवली जाणार आहे. भारतासह पाकिस्तान , अफगाणिस्तान , बांगलादेश , हाँगकाँग , ओमान , श्रीलंका , संयुक्त अरब अमिराती हे संघ या स्पर्धेत सहभागी होणार आहेत.

**<u>निधन</u>**

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाचे कुलगुरु प्राध्यापक हरेराम त्रिपाठी आणि त्यांच्या पत्नीचा काल रस्ते अपघातात मृत्यू झाला. उत्तर प्रदेशमधल्या कुशीनगरजवळ हा अपघात झाला. प्राध्यापक हरेराम त्रिपाठी हे भारतीय दर्शनशास्त्र, न्यायशास्त्राचे प्रख्यात विद्वान आणि तत्वज्ञ होते. राज्यपाल आणि कुलपती सी. पी. राधाकृष्णन यांनी त्यांच्या निधनाबद्दल तीव्र दुःख व्यक्त केलं आहे. संस्कृत भाषेसाठी निष्ठेनं झटणारा एक संशोधक, अभ्यासक आणि उत्तम प्रशासक गमावला आहे, असं त्यांनी आपल्या शोकसंदेशात म्हटलं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही प्राध्यापक हरेराम त्रिपाठी यांना श्रद्धांजली वाहिली. तसंच केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, नागपूरचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनीही त्यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे.

**<u>चिपळूणपूल</u>**

चिपळूणतालुक्यातील पिंपळी-नांदीवसे या रस्त्यावरील खडपोली पूल काल रात्री कोसळला आहे. दसपटी भागाला जोडणारा हा 23 क्रमांकाचा जिल्हा मार्ग आहे. पूल कोसळल्याने या मार्गावरील वाहतूक पेढांबे ते खडपोली या पर्यायी

मार्गाने वळवण्यात आली आहे. हा पूल पन्नास वर्ष जुना असून, दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसल्याचं आमच्या वार्ताहराने कळवलं आहे.

**<u>हवामान</u>**

येत्या दोन दिवसांत कोकणात बहुतांश ठिकाणी, मध्य महाराष्ट्रात आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी, तर विदर्भात बऱ्याच ठिकाणी तसंच कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी जोरदार पावसाची शक्यता तर किनारपट्टी भागात सोसाट्याचा वारा वाहील, असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं , नमस्कार.**